| CNR No.MHSO170018972023 | दाखल दिनांक | ०४/०७/२०२३ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | ०४/०७/२०२३ | | |
| | निकाल दिनांक | ३०/०३/२०२६ | | |
| | कालावधी | ०२ व. | ०८ म. | २७ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.२, माढा**
(पिठासीन अधिकारी – व्ही.सी.क्षीरसागर)

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज.क्र.२४/२०२३** **निशाणी क्र.६०**

वनिता गणेश पांडव
वय– ३४ वर्षे, व्यवसाय – काही नाही
रा. कविटगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर
ह. रा. द्वारा दत्तात्रय संभाजी जाडकर,
रा. मोडनिंब, ता.माढा, जि. सोलापूर ... अर्जदार

**विरुध्द**

१. गणेश भानुदास पांडव
वय – ३९ वर्षे, व्यवसाय – शेती व व्यापार
रा. कविटगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर
ह. रा. कंदर, ता.माढा, जि. सोलापूर

२. कोंताबाई महादेव लोंढे
रा. कोंढेज, ता. करमाळा, जि. सोलापूर

३. अमृता राहुल वाघमारे
रा. वरकटणे, ता. करमाळा, जि. सोलापूर

४. उषाबाई आबा लोंढे
रा. कोंढेज, ता. करमाळा, जि. सोलापूर

५. आबा महादेव लोंढे
रा. कोंढेज, ता. करमाळा, जि. सोलापूर
६. आशाबाई कल्याण कांबळे
रा. गट नं. २, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर ... गैरअर्जदार

..........................................................................................................
अर्ज – कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२, १८, १९, २० व २२ अन्वये
..........................................................................................................
..........................................................................................................
अर्जदारातर्फे विधीज्ञ – श्री. एस. एस. सुर्वे
गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ – श्री. एस. बी. रोकडे
..........................................................................................................

**न्या य नि र्ण य**
(घोषित दिनांकः ३० मार्च, २०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२, १८, १९, २० व २२ प्रमाणे दाखल केला आहे (यानंतर 'सदर कायदा').

२. अर्जदाराचे कथनः– गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिचा पती असून गैरअर्जदार क्र.२ ते ४ या नंणदा आहेत. गैरअर्जदार क्र.५ हा अर्जदार हिचा नंदावा व गैरअर्जदार क्र.४ तिचा पती आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ५ हे वर नमुद पत्यावर कायमस्वरुपी एकत्रात राहतात व एकत्र राहुन कोणत्याही दुष्कृत्यास एकमेकांना सहाय्य करतात. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे नात्याने पती–पत्नी आहेत. अर्जदार हिचा विवाह गैरअर्जदार क्र.१ यांचे बरोबर दि.०२/०३/२०१२ रोजी मौजे कविटगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे झालेला असून सदरचे लग्न अर्जदार हिचे आई–वडीलांनी लग्नामध्ये मोठा खर्च करुन तसेच यातील गैरअर्जदार यांना पाच तोळे सोन्याचे दागिने, कपडेलत्यासाठी रक्कम रुपये साठ हजार रुपये तसेच लग्नामध्ये संसारउपयोगी साहित्य, जेवणसाठी रक्कम

रु.५०,०००/– तसेच फोटो व्हिडीओ शुटींग यासाठी रक्कम रु.२०,०००/– आणि इतर खर्च मिळुन रक्कम रु. ५०,०००/– अशी एकुण रक्कम रु.३,५०,०००/– रुपयाचा खर्च हा अर्जदार हिचे आई–वडीलांनी करुन सदरचे लग्न मोठे थाटामाटात करुन दिलेले आहे व सदर लग्नामध्ये दिलेल्या वस्तु या गैरअर्जदार यांचेच ताब्यात आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न संबंध अद्याप कायम अस्तीत्वात आहेत. सदर लग्न संबंधातून अर्जदार हिस गैरअर्जदार क्र.१ यांचेपासून एक मुलगी शिवन्या ही दि.२६/११/२०१८ रोजी जन्मलेली आहे. तथापि, अर्जदार ही पहिल्या वेळेस गरोदर राहिल्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस मानसिक व शारीरिक त्रास दिल्यामुळे अर्जदार हिचे सिझर होऊन सदर मुल मयत झालेले होते.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिस सदर दवाखान्याचा खर्च तुझ्या माहेरुन घेवुन ये म्हणून सतत मारहाण करीत होता व त्यास गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांची फुस होती. ते गैरअर्जदार क्र.१ यास मदत देखील करीत होते. अर्जदार हिचे लग्न झालेनंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांचे घरी मौजे कविटगांव, ता. करमाळा येथे गेली होती. अर्जदार हिस गैरअर्जदार यांनी जेमतेल १५ दिवस व्यवस्थित नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिच्याशी बोलत देखील नव्हता. तसेच घरातील इतर लोक तिला टोचुन बोलत असत तसेच 'तु माहेरहुन अंगठी आण लग्नामध्ये सोफासेट, मोठ्या वस्तु आण.' म्हणून महिना पंधरा दिवसांनी मारहाण करीत असत. तसेच अर्जदार ही तिसऱ्यांदा गरोदर राहिलेली होती. त्यावेळेस गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस प्रचंड मारहाण केली व पोटावर लाथा मारल्यामुळे जुळा गर्भ मयत झाला. त्यामुळे गैरअर्जदार हा प्रचंड विकृत मानसिकतेचा इसम आहे. सदर गैरअर्जदार हा अर्जदार हीस कधीही वेळेवर दवाखान्यात नेत नव्हता. तरी देखील अर्जदार हिस नांदावयाचे असल्याने ती सर्व त्रास निमुटपणे सहन करीत असे.

४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सदर गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला दुसरे लग्न करण्याची वारंवार धमकी व व्हॉटसअपवर मॅसेज पाठविले होते. त्यासंबंधी अर्जदार हिने करमाळा पोलीस स्टेशन मध्ये अदखपात्र गुन्हा क्र.४५७/२०२२ ही तक्रार गैरअर्जदार यांचेविरुध्द दाखल केलेली होती. त्याचा राग मनात धरुन गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस व तिचे मुलीस दि.१५/०३/२०२२ रोजी अंगावरील कपडयानिशी घरातुन हाकलून दिले व मुलगी शिवन्या हिचे आधार कार्ड व जन्माचा दाखला स्वतःकडेच ठेवुन घेतला. त्यामुळे सद्या

शिवन्या हिचे शैक्षणिक वर्षाकरीता त्याची आवश्यकता असून देखील सदरचा जन्माचा दाखला व आधार कार्ड देण्यास गैरअर्जदार यांनी नकार दिलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिस प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, दरम्यानचे काळामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ यांचेकडे अर्जदार हिस घेऊन जावे म्हणून हस्ते–परहस्ते बराच प्रयत्न केला. परंतु गैरअर्जदार हा अर्जदार हिस नांदावयास घेवुन गेला नाही अगर नांदावयास घेवुन जाणेबाबत कोणत्याही हालाचाली केलेल्या नाहीत. अर्जदार हिस नांदविण्यास नकार दिला तेव्हापासुन अर्जदार ही तिचे आई–वडीलांकडे धर्मार्थ जिवन जगत आहे. तथापि, अर्जदार हिचे आई–वडील वृध्द झाल्याने आता अर्जदार हिचे पालनपोषण करु शकत नाहीत. त्यामुळे तिला जगण्याचा कोणताही आधार नाही. अशातच गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारीरिक व मानसिक त्रास देवुन कसलाही विचार न करता अर्जदार अंधातरी सोडून दिलेले आहे. अर्जदार हिचे पोटापाण्याची, कपडेलत्ता, औषधोपचाराची कसलीही व्यवस्था गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिचेवर उपासमीरीची वेळ आलेली आहे. अर्जदार यांना कोणताही कामधंदा होत नाही व सध्या अर्जदार हिचे लहान मुलगी असल्यामुळे त्यांचे उपजिवीकेसाठी कामधंदा करता येत नाही. तसेच अर्जदार ही मौजे मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर येथे भाडयाचे खोलीमध्ये तीचे मुलीसह राहत आहेत.

६. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार यांचे नावे नावे मौजे कंदर, ता. करमाळा येथे जमीन गट क्र. ३८ ही मिळकत गैरअर्जदार क्र.१ यांचे नावे असून सदरची शेती बागायत स्वरुपाची आहे. सदर शेतीचे उत्पन्नातुन दरवर्षी रक्कम रु. २० ते २५ लाख रुपयाचे निव्वळ उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार हा केळीचा मोठा व्यापारी असुन सदर व्यवसायातुन त्यांना दरमहा रक्कम रुपये एक लाख रुपये निव्वळ नफा मिळतो. करिता, अर्जदाराने गैरअर्जदारांकडून तिच्या चरितार्थ, औषधपाणी व इतर कारणासाठी निर्वाह पोटगी, निवा–याचे आदेश, संरक्षण आदेश व नुकसान भरपाई मिळण्याची विनंती केली आहे.

७. गैरअर्जदार हे प्रस्तुत प्रकरणात हजर होऊन त्याचे म्हणणे निशाणी क्र.११ येथे दाखल करुन अर्जदाराची कथन नाकारले आहेत. गैरअर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र व जाती रूंढी परंपरेनुसार

दि.०२/०३/२०१२ रोजी मौजे कविटगांव, ता. करमाळा, जि सोलापूर येथे झालेला आहे. प्रस्तुत लग्नाचा संपुर्ण खर्च हा गैरअर्जदार यांचे वडिलांनी केला होता. सदर लग्नात गैरअर्जदार यांनी अर्जदार व तिचे कुटूंबियांकडून काहीएक चीज वस्तू घेतलेली नाही. गैरअर्जदार व अर्जदार यांचे पती पत्नीचे नातेसंबंध आजही कायम असून सदरचे नाते संबंधातून उभयतांना दि.२६/११/२०१८ रोजी शिवन्या नावाची मुलगी झालेली आहे.

८. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदर विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांचे घरी सुरूवातीचे आठ दिवस व्यवस्थित नांदली. तद्नंतर अर्जदार ही 'मौजे कविटगांव येथे करमत नाही, मला येथे राहायचे नाही.' अशी नाहक कारणे गैरअर्जदार यास देऊ लागली. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडे मौजे मोडनिंब, ता. माढा येथे तिचे माहेरी कायमचे राहायला जाण्याचा हट्ट धरू लागली. पुढे काही दिवसांनी अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडे माहेरी राहायला जाण्याबद्दल तगादा लावू लागली. अर्जदार हिस तीन बहिणी असून तिला भाऊ नाही. अर्जदार तिच्या आई–वडिलांची अत्यंत लाडाची लेक आहे. अर्जदारचे वडिलांना मौजे मोडनिंब, ता. माढा येथे शेती असून अर्जदार हिस भाऊ नसलेने अर्जदार ही गैरअर्जदारस तिच्या आई–वडिलांकडे मौजे मोडनिंब येथे घरजावई म्हणून राहायला जाऊ व तिथेच वडिलांची शेती चांगली करून तिथेच कायमचे स्थायिक होऊ असा हट्ट धरू लागली.

९. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडे आठ दिवसांपेक्षा जास्त काळ कधीही व्यवस्थित नांदली नाही. पुढे अर्जदार ही गैरअर्जदार व त्यांच्या आईशी विनाकारण किरकोळ कारणांवरून सतत भांडणे करू लागली. अर्जदार ही मन मानेल तेव्हा तिचे माहेरी निघून जात असत. तसेच अर्जदार ही बऱ्याचदा गैरअर्जदार यास जीव देणेची धमकी देऊन माहेरी सोडविण्यास भाग पाडत असे. अर्जदार ही मनमौजी असून ती माहेरी निघून गेलेनंतर तिला परत घेऊन येईपर्यंत ती नांदायला येण्याचे नाव घेत नसे. गैरअर्जदार हे अर्जदार हिचेशी संसार कायम टिकवून ठेवण्याच्या भाबड्या आशेने अर्जदार हिची हरएक मागणी पूर्ण करू लागले. यातूनच अर्जदाराच्या वडिलांची शेती जिरायत असलेने तीस बागायती करण्यासाठी गैरअर्जदार याने त्याच्या आईचे सोने गहाण ठेवून स्वतः जातीने अर्जदाराच्या वडिलांच्या शेतामध्ये बोअर घेऊन, त्यावर सबमर्शीबल मोटार टाकून, पाईपलाईन वगैरे करून देऊन शेतजमीन बागायती करणेकामी सुमारे दीड लाख रूपये खर्च केला. सदर खर्चाची रक्कम

गैरअर्जदारास त्याचे सासऱ्याने अद्याप परत केलेली नाही. गैरअर्जदार हे संसार सुखापोटी आपली प्रत्येक मागणी पुर्ण करत हे अर्जदार हिच्या लक्षात आल्याने ती गैरअर्जदारचा अधिक गैरफायदा घेऊ लागली. यातूनच अर्जदार हिने तिच्या वडिलांना घर बांधायचे आहे असे सांगून गैरअर्जदाराकडे रक्कम रू.१,००,०००/– ची मागणी केली. गैरअर्जदार याने अर्जदार हिस सदर रक्कम देण्यास नकार देताच अर्जदार हिने गैरअर्जदार व त्याच्या आईस शिवीगाळ केली व दि.१५/०९/२०२१ रोजी महालक्ष्मीच्या म्हणजेच गौरीपुजनच्या पवित्र सणादिवशी गैरअर्जदाराचे घर स्वतःहून सोडून निघून गेली.

१०. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, सन २०१६ साली गैरअर्जदाराचे वडील कॅन्सरचे आजाराने मयत झाले. त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदार हिस त्याबाबत संपर्क साधून माहिती दिली होती. तरी देखील अर्जदार ही गैरअर्जदार यांचे वडिलांचे अंत्यविधीस अथवा इतर धार्मीक विधीस आली नाही. गैरअर्जदार यांना त्यांचे वडिलांचे आजारपणात देखील गैरअर्जदार स बराच मोठा खर्च झालेला आहे. तसेच पुढे अर्जदार घर सोडून गेलेनंतर काही दिवसांनी गैरअर्जदाराची आई देखील कोरोनाच्या साथीने निधन झाले. पुढे अर्जदार ही इतकी निष्ठुर वागू लागली की, ती गैरअर्जदाराच्या आईच्या अंत्यविधीला अथवा सावडायला मोबाईलवरून संपर्क करून कळवून देखील आली नाही. गैरअर्जदाराने संसार वाचविण्यासाठी आजतागायत काबाड कष्ट करून, तसेच गावातील लोकांकडून व्याजाने पैसे घेऊन अर्जदार व तिच्या माहेरच्या लोकांचे नाहक सुमारे दहा लाख रूपयाचे आर्थिक लाड पुरविलेले असलेने गैरअर्जदार यांचेवर मोठे कर्ज झालेले आहे. त्याकामी गैरअर्जदार याने त्यांचे नावे असणारी जमीन विक्री करून अर्जदार हिचे वडिलांना दिलेली रक्कम, गावातील लोकांकडून व्याजाने घेतलेले पैसे याची परतफेड केलेली आहे. एवढे सगळे करून देखील अर्जदार ही गैरअर्जदार यांचेकडे व्यवस्थित नांदत नाही. अर्जदाराच्या अशा वाईट वागण्यास तिचे आई–वडील व मौजे पापणस, ता. माढा येथील अर्जदार हिची मावशी व मावस भाऊ यांची फुस आहे.

११. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार अर्जदार व उभयतांची मुलगी शिवन्या हिला त्याचे राहते घरी नांदायला घेऊन जाण्यासाठी नेहमी अर्जदार हिची आई, मावशी व मावस भाऊ तसेच गैरअर्जदाराचे दाजी, चुलते व इतर गावातील लोकांचेकरवी वारंवार संपर्क करून संभाषणाचा प्रयत्न करत आहेत. गैरअर्जदार बऱ्याचदा अर्जदार हिस व उभयतांची मुलगी

शिवन्या हिस भेटायला मौजे मोडनिंब येथे गेले असता अर्जदार हिचे आई–वडील तशी भेट जाणीवपुर्वक होऊ देत नाहीत. गैरअर्जदाराने अनेकदा प्रयत्न करून देखील अर्जदार नांदायला येण्यास स्पष्ट नकार देत आहे. वास्तविक गैरअर्जदार याने अर्जदार हिस दि.२५/०१/२०२२ रोजी वकिलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीस अर्जदार हिने अद्यापपावेतो कोणताही, कसलाही प्रतिसाद न देता उलट सदर नोटीसीचा नाहक राग मनात धरून गैरअर्जदाराविरूध्द करमाळा पोलीसांकडे खोट्या स्वरूपाची तक्रार केली. सदर खोट्या तक्रारीच्या आधारे अर्जदार हिने गैरअर्जदारविरूध्द खोटी व काल्पनिक रचना करून गैरअर्जदारांविरूध्द प्रस्तुतचा खोटा अर्जदाखल केलेला आहे.

१२. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, आजमितीस गैरअर्जदार याचे आई–वडिल दोघेही मयत असलेने गैरअर्जदार यास अर्जदार व उभयतांची मुलगी शिवन्या यांच्याशिवाय इतर कोणीही जवळचे कौटुंबिक सदस्य नाही. अर्जदार ही घर सोडून निघून गेल्यापासून गैरअर्जदार हे धर्मार्थ जिवन जगत आहेत. अर्जदार हिने जाणीवपुर्वक गैरअर्जदार यास संसार सुखापासून व मुलीच्या प्रेमापासून वंचित व अलिप्त ठेवले आहे. गैरअर्जदार याने कधीही दुसरे लग्न करणेबाबत वक्तव्य केलेले नाही. गैरअर्जदार हे तरूण असून त्याची प्रथमपासून अर्जदाराशी संसार करण्याची प्रामाणिक इच्छा आहे. गैरअर्जदार हा आजही अर्जदारशी संसार करणेस व तीस परत नांदणेस येणेकामी गैरअर्जदार याने मा. करमाळा येथील दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर यांचेकडे हिंदु विवाह कायदा, कलम ९ अन्वये एच. एम. पी. नं. १७६/२०२३ अन्वये अर्ज दाखल केलेला असून त्याचे कामकाज मा. न्यायालयात प्रलंबित आहे.

१३. गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा यापुर्वी देखील अर्जदार यांना अतिशय चांगल्या प्रकारे सांभाळ व पालनपोषण करत होता व अर्जदार हीस चांगले प्रकारे नांदवित होता. यापुढे देखील गैरअर्जदार हा अर्जदार हिस चांगल्या प्रकारे नांदविणेस तयार आहे व अर्जदार यांचा चांगल्या प्रकारे पालण पोषण करणेस तयार आहे. अर्जदार प्रस्तुत अर्जात म्हणते त्याप्रमाणे गैरअर्जदार यास शेतीपासून कोणतेही कसलेही उत्पन्न मुळीच मिळत नाही. गैरअर्जदार याचे नावे काहीएक शेतजमीन नाही. गैरअर्जदार हा मुळीच केळीचा व्यापारी नसून त्यास उत्पन्नाचे काहीएक साधन नाही. गैरअर्जदार यांचे नावे एक गुंठा देखील जमीन नसून त्यांचेकडे मुळीच वाडवडिलार्जित जमीन नाही. गैरअर्जदार यास भयंकर कष्ट करून त्याचा

उदरनिर्वाह करावा लागत आहे. याउलट, अर्जदार हिचे माहेरी वडिलांचे घरी बागायती जमीन असून त्यापासून भरपुर उत्पन्न मिळते. त्यामध्ये अर्जदार हिचा देखील हिस्सा असून त्यामधून अर्जदार ही स्वतःचा व मुलगी शिवन्या हिचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे करते. अर्जदार हिने गैरअर्जदार याचा सप्टेंबर २०२१ मध्ये स्वतःहून काहीएक कारण नसताना त्याग केलेला आहे. गैरअर्जदार हे आजही अर्जदार यांना नांदविणेस तयार व कबुल आहेत. गैरअर्जदार हा मोलमजुरी करत असून त्यांना त्यांचे उत्पन्नाचा कोणताही पर्याय नसून अर्जदार यांना पोटगी व घरभाडे देण्याची गैरअर्जदार यांची ऐपत नाही. गैरअर्जदार यांचेकडे कोणतेही उदरनिर्वाहाचा पर्याय उपलब्ध नाही. गैरअर्जदार हा सध्या मजुरी करून त्याची उपजिवीका भागवत आहे. त्यामुळे गैरअर्जदार याची अर्जदार यांना कोणत्याही कसल्याही स्वरूपाची पोटगी देणेची मुळीच ऐपत नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार याचा स्वतःहून त्याग केल्यामुळे अर्जदार ही पोटगीचे मागणीसाठी कायद्याने मुळीच पात्र नाही. करिता, अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

१४. सदर अर्जावरुन अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ सोबत कविटगाव, ता. माढा येथे नांदत असून ती गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांचेसोबत कधीही एकत्र सामाईक कुटूंबामध्ये राहिले नसल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराने सदर अर्जामध्ये गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांच्याविरुध्द कोणतेही कौटुंबिक हिंसाचाराबाबतची स्पष्ट कथने नमूद नसल्याने गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांच्याविरुध्द निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये प्रोसिंडींग ड्राप करण्यात आले.

१५. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. जी. सी. काळे यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारास पुरेशी संधी देऊन देखील गैरअर्जदाराने युक्तीवाद केला नाही. अभिलेखावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवत असून त्यावरील निष्कर्ष व कारणे मी खालील प्रमाणे देत आहेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ वनिता हिने हे सिध्द केले आहे का की, गैरअर्जदार क्र.१ याने लग्नानंतर तिच्यावर वरीलप्रमाणे घरगुती हिंसाचार केला? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार क्र.१ हिने हे सिध्द केले आहे का की, ती मागणी केल्याप्रमाणे संरक्षण आदेश, निवासी आदेश तसेच गैरअर्जदाराकडून अर्जदार व तिच्या मुलीस दरमहा रक्कम रु.३०,०००/– पोटगी तसेच नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे? | अंशतः होकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

१६. अर्जदार वनिता हिने अर्जाच्या पुष्टयर्थ स्वतःच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.२९ वर दाखल केलेला आहे. अर्जदाराने तिचे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.१० येथे दाखल केले आहे. अर्जदार हिने निशाणी क्र.४० वर तिचा तोंडी पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे. याउलट, गैरअर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ स्वतःच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.५१ वर दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराने त्यांचे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.१३ येथे दाखल केले आहे. गैरअर्जदारांनी पुरेशी संधी देऊन गैरअर्जदार क्र.१ त्याचे उलटतपासाकरिता हजर राहिला नाही तसेच त्याने पुढील पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये गैरअर्जदाराचा पुरावा बंद करण्यात आला.

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दा क्र.१ करीताः–</u>

१७. अर्जदाराच्या वकिलांनी गैरअर्जदारांनी अर्जदाराचा वर नमूद कारणांकरीता कौटूंबिक हिंसाचार करुन अर्जदाराचा त्याग केल्याचा युक्तीवाद केला. याउलट, गैरअर्जदारास पुरेशी संधी देऊन देखील त्याने युक्तीवाद केला नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते.

१८. अर्जदार वनिता हिने तिच्या कथनाच्या समर्थनार्थ तिच्या पुराव्याच्या शपथपत्र निशाणी क्र.२९ वर दाखल करुन त्यात अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. गैरअर्जदारातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये ती माहेरी असताना गैरअर्जदार तिच्या

मुलीला भेटण्याकरिता येत असल्याचे तसेच दि.२५/०१/२०२२ रोजी गैरअर्जदाराने तिला नांदविण्याकरिता नोटीस पाठविल्याचे मान्य केले आहे. तिने गैरअर्जदारातर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तरसुचक प्रश्नांनानकारार्थी उत्तरे दिले आहेत.

१९. गैरअर्जदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.५१ वर दाखल करुन त्यात त्याच्या म्हणण्यातील कथनांची पुनर्वरावत्ती केली आहे. परंतु, गैरअर्जदार उलटतपासाकामी हजर राहिला नाही. तसेच, इतर पुरावा दाखल केला नाही.

२०. अभिलेखावरील अर्जदार वनिता हिच्या नि.क्र.२९ वरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तिने त्यामध्ये अर्जाप्रमाणेच कथन केले की, गैरअर्जदारांना तिला नमूद कारणांकरिता वेळोवेळी पैशांची मागणी करुन शारीरिक व मानसिक छळ केला तसेच तिला घरातून हाकलून दिले. गैरअर्जदारांनी वर नमूद मुददयावर अर्जदाराचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे अर्जदाराचा वरील पुरावा विना आव्हानीत व अखंडीत राहिला आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराचा उलटतपास घेऊन देखील अर्जदार तिच्या कथनांशी ठाम राहिल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या कथनांशी विसंगत असा कोणताही पुरावा अभिलेखावर आणला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदाराचे कथने विश्वासार्ह वाटतात. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदाराने त्याच्याविरुध्द तक्रार अर्ज दाखल केल्याचे मान्य केल्याचे दिसून येते. त्यामुळे गैरअर्जदारांनी अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ केला या अर्जदाराच्या कथनास पुष्टी मिळते. याउलट, गैरअर्जदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असले तरी गैरअर्जदार क्र. १ हा उलटतपासासाठी हजर राहिला नसल्याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र विचारात घेता येणार नाही.

२१. अभिलेखावरुन अर्जदार तिच्या मुलीसह दि.१५/०३/२०२२ पासून गैरअर्जदारांपासून विभक्त राहत असल्याचे दिसून येते. अभिलेखावरील पुराव्यावरुन अर्जदार गैरअर्जदारासोबत नांदायला जाण्यास तयार असल्याचे दिसून येते. परंतु, गैरअर्जदाराने अर्जदारास नांदायला घेऊन जाणेकरीता काही प्रयत्न केले नसल्याचे दिसून येते. अभिलेखावरुन अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ गणेश याच्यापासून विभक्त राहत असलेपासून गैरअर्जदारांनी तिची व तिच्या मुलीची उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केले नसल्याचे दिसून येते. निर्विवादपणे, अर्जदार व तिच्या मुलीची सांभाळ करणे व त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे हे

गैरअर्जदार क्र.१ याचे कायदेशीर कर्तव्य आहे. त्यामुळे अर्जदार हिची उपरोक्त कथने हे सदर कायद्याच्या कलम ३ (अ, ब व क) नुसार 'घरगुती हिंसाचाराच्या' मानसिक व आर्थिक हिंसेमध्ये मोडणारे आहे. त्यामुळे अर्जदार हिचा गैरअर्जदार क्र.१ याने घरगुती हिंसाचार केल्याचे दिसून येते. करीता, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

२२. अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द संरक्षणात्मक आदेश मिळण्याची मागणी केल्याचे दिसून येते. अभिलेखावरुन अर्जदार ही सध्या तिच्या आई–वडीलांकडे मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर येथे राहत असल्याचे दिसून येते. अर्जदार दि.१५/०३/२०२२ रोजीपासून माहेरी राहत असताना गैरअर्जदारांनी त्यांच्या घरी येऊन अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ केला यासंदर्भाने अर्जदाराने काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र नसल्याचे दिसून येते.

२३. अर्जदाराने तिला व तिच्या मुलीस गैरअर्जदाराकडून निवा–याची सोय मिळण्याची विनंती केली आहे. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये ती तिच्या मुलीसह भाडयाने राहत असल्याचे कथन केले असले तरी तिने अभिलेखावरती ती कधीही स्वतंत्र किंवा भाडयाच्या घरामध्ये राहत असल्यासंदर्भाने कोणताही स्पष्ट पुरावा आणला नसल्याचे दिसून येते. तसेच तिने ती तिच्या आईवडिलांसोबत मोडनिंब येथे राहत असल्याचे कथन केले आहे. अभिलेखावरुन अर्जदार ही तिच्या मुलीसह तिच्या आई–वडिलांच्या घरी राहत असल्याचे दिसून येते. तिने राहण्यासाठी कोठे व कशा प्रकारची व्यवस्था हवी आहे, यासंदर्भाने तिने अभिलेखावर काहीही कथन केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ती निवारा किंवा घरभाडे मिळण्यास पात्र नसल्याचे दिसून येते.

२४. अर्जदाराच्या कलम २० व २२ प्रमाणे अर्जदाराकरिता गैरअर्जदारांकडून रु.३०,०००/– प्रति महिना पोटगी व नुकसान भरपाई पोटी एकमुस्त रक्कम रु.१०,००,०००/– मिळण्याच्या आहेत. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे आजरोजी तिच्याकडे स्वतःचा सांभाळ करण्यासाठी पुरेसे उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, गैरअर्जदार यांचे नावे नावे मौजे कंदर, ता. करमाळा येथे जमीन गट क्र. ३८ ही मिळकत गैरअर्जदार क्र.१ यांचे नावे असून सदरची शेती बागायत स्वरुपाची आहे. सदर शेतीचे उत्पन्नातुन दरवर्षी रक्कम रु. २० ते २५

लाख रुपयाचे निव्वळ उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार हा केळीचा मोठा व्यापारी असुन सदर व्यवसायातुन त्यांना दरमहा रक्कम रुपये एक लाख रुपये निव्वळ नफा मिळतो. परंतु, अभिलेखावरुन असे दिसते की अर्जदार वनिता हिने गैरअर्जदाराकडे तिने कथन केल्याप्रमाणे प्रतिवर्ष रक्कम रुपये वीस ते पंचवीस लाखाचे उत्पन्न मिळत असलेबाबतचा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे, गैरअर्जदारास अर्जदाराने नमुद केल्याप्रमाणे शेतीतून रक्कम रुपये वीस ते पंचवीस लाखाचे उत्पन्न मिळते, हे नि:संशय सिध्द होत नाही.

२५. गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार तिच्या वडीलांची शेती वहिवाटून उत्पन्न घेते. परंतु, गैरअर्जदाराने अर्जदार सदर शेती वहिवाटून उत्पन्न घेत असलेबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आणला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदाराकडे स्वतःचे उत्पन्न असून ती स्वतःचा व तिच्या मुलीचा उदरनिर्वाह करण्याकरिता सक्षम असलेबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आणले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदारास उत्पन्नाचे कोणताही साधन नसल्याचे दिसून येते.

२६. अभिलेखावरुन गैरअर्जदाराने त्यांच्या निशाणी क्र.११ वरील त्याचे म्हणण्यामध्ये तो मजूरी करत असल्याचे मान्य केल्याचे दिसून येते. तसेच अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला निशाणी क्र. ५८ वरील सातबारा उता–यावरुन तसेच नि.क्र. ५९ वरील मौजे कंदर येथील फेरफार क्र.७१९० वरुन गैरअर्जदाराने त्याचे नावे असलेले गट क्र.३८ मधील ४० आर क्षेत्र अतुल मनोहर केदार यांना दि.२१/१०/२०२१ रोजी रक्कम रु.४,७०,०००/– करिता विक्री केल्याचे दिसून येते. तसेच मौजे कंदर येथील गट क्र.३८ च्या सातबारा उता–यावरुन गैरअर्जदाराच्या वडीलांच्या नावे १३ आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ गणेशवर अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही अवलंबून नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अभिलेखावरील गैरअर्जदाराचे उत्पन्नासंदर्भाने आलेल्या पुराव्यावरुन गैरअर्जदार क्र.१ गणेश हा मजूरी व शेती काम करत असून त्याच्याकडे उत्पन्नाचा साधन असून तो अर्जदार वनिता व तिच्या मुलीस सांभाळण्यास सक्षम असल्याचे दिसून येते.

२७. वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदार व तिच्या मुलीस सांभाळण्याची कायदेशीर जबाबदारी त्याच्यावर असल्याने त्यास अर्जदार व तिच्या मुलीस उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे, त्याची क्षमता, अर्जदाराची गरज व आजची महागाई लक्षात घेता,

माझेमते अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ गणेश याच्याकडून प्रतिमाह रु.३,०००/– आर्थिक मदत मिळण्यास पात्र आहेत. तसेच, अर्जदाराची मुलगी शिवन्या ही गैरअर्जदार क्र.१ गणेश याच्याकडून प्रतिमाह रु.१,५००/– ती सज्ञान होईपर्यंत आर्थिक मदत मिळण्यास पात्र आहे. आजपर्यंत अर्जदार वनिता हिच्यावर झालेल्या घरगुती हिंसाचारापोटी ती गैरअर्जदारांकडून रक्कम रु.१५,०००/– मिळण्यास पात्र आहे. करिता, मुददा क्र.२ चे अंशतः होकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्र.३ करीताः–**

२८. मुद्दा क्र.१ व २ च्या वरील निष्कर्षावरुन अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. करिता, आदेश.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ गणेश भानुदास पांडव यास याद्वारे आदेशीत करण्यात येते की, त्याने सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दि.०४/०७/२०२३ रोजीपासून अर्जदार वनिता हिस प्रतिमाह पोटगी रक्कम रु.३,०००/– (फक्त रक्कम रुपये तीन हजार) व अर्जदाराची मुलगी शिवानीला प्रतिमाह पोटगी रक्कम रु. १,५००/– (फक्त रक्कम रुपये एक हजार पाचशे) ती सज्ञान होईपर्यंत द्यावे. |
| ३. | गैरअर्जदार क्र. १ गणेश भानुदास पांडव यास याद्वारे असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी नुकसान भरपाईपोटी अर्जदार वनिता हिस रक्कम रु.१५,०००/– (फक्त रक्कम रुपये पंधरा हजार)द्यावेत. |
| ४. | सदर आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावे. |
| ५. | सदर आदेशाची प्रत संबंधीत पोलिस स्टेशनला पाठविण्यात यावे. |

(न्यायनिर्णय न्यायासनावर निवेदित व घोषीत)

VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR

Digitally signed by VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Date: 2026.04.02 18:05:16 +0530

(व्ही.सी.क्षीरसागर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), माढा

दि.३०/०३/२०२६

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | N. B. Kamurti |
| Court Name | : | Smt. V.C. Kshirsagar<br>3rd Jt.CJJD & JMFC, Madha |
| Date of Order/Judgment | : | 30/03/2025 |
| Order/judgment signed by presiding officer on | : | 30/03/2025 |
| Order/judgment uploaded on | : | 02/04/2025 |